**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**कार्यपत्रिका क्र. ७**

दिनांक :- १९/१२/२०१२ वेळ :- १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. १९/१२/२०१२ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | अध्यक्षा |
| २. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| ३. | मा. भोंडवे मोरेश्वर महादू | सदस्य |
| ४. | मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव | सदस्य |
| ५. | मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | सदस्य |
| ६. | मा. शमीम पठाण | सदस्य |
| ७. | मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| ८. | मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन | सदस्य |
| ९. | मा. डोके अपर्णा निलेश | सदस्य |
| १० | मा. को-हाळे अनंत सुभाष | सदस्य |
| ११ | मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख | सदस्य |
| १२ | मा. शेट्टी प्रसाद | सदस्य |
| १३ | मा. साळुंके सविता सुरेश | सदस्य |
| १४. | मा. पालांडे सुजाता सुनिल | सदस्य |
| १५. | मा. पानसरे अमिना मोहंम्मद | सदस्य |
| १६. | मा. मंचरकर गिता सुशिल | सदस्य |
| १७. | मा. साबळे छाया जगन्नाथ | सदस्य |
| १८. | मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव | सदस्य |
| १९ | मा. आसवानी सविता धनराज | सदस्य |
| २०. | मा. ओव्हाळ शेखर अशोक | सदस्य |
| २१. | मा. पवार यमुनाताई रमणनाना | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी अजीज कारचे, मा. कार्य. अभियंता मकरंद निकम, शरद जाधव, रामदास जाधव, ए.ए. पठाण, प्रशासन अधिकारी एस.एन. राऊत, उपअभियंता डी. एन गट्टूवार, संजय कांबळे, एम. एम. चव्हाण, एस.एन.वाघुंडे, एम.डी.पाटोदकर, व्ही.एन.देसले, आर.पवार, व्ही. सी. काळे एस.एस. मोरे, मोमीन झेड. आय. सहा. आरोग्याधिकारी एन.एम.नाईक, कार्या. अधि. अतिक्रमण बी.टी. बो-हाडे, उद्यान एस.पी. गायकवाड, इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

मागील सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आला.

प्रशासन अधिकारी (सभाशाखा) ब प्रभाग समिती यांनी विषयपत्राचे वाचन केले. तदनंतर मा. अध्यक्षांचे परवानगीने खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेतले.

विषय क्र. २ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

क्रां. चापेकर स्मारक समितीचे गुरुकुल येथील रस्त्यांवर दिव्यांची व्यवस्थाप करण्याबाबत. तसेच चिंचवड गावांतील म.न.पा. शाळेतील क्रिडांगणामध्ये जादा प्रकाश पडणारे दिवे (हायमास्ट) बसविणे.

विषय क्र. ३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

चिंचवडगांव येथील दशक्रिया विधी घाटातील स्नानगृह हे सुलभ शौचालयाजवळ स्थलांतरीत करण्यात यावे. तसेच तेथील मुतारी काढून टाकण्यात यावी.

विषय क्र. ४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

नामकरण करणेबाबत.

- पुनावळे येथील माळवाडी येथील संत सावता माळी मंदीराजवळील लोक वस्तीस माळवाडी हे नांव देण्यात यावे.
- पुनावळे येथील सागर ओव्हाळ यांच्या घराजवळील वस्तीत ओव्हाळ वस्ती हे नांव देण्यात यावे.
- पुनावळे येथील तलाठी ऑफीसकडून कैलासनगगरकडे जाणा-या रस्त्यास जिजाबाई ओव्हाळ मार्ग नांव देण्यात यावे.
- पुनावळे येथील माळवाडी येथे विठ्ठल भुजबळ यांच्या घराजवळील वस्तीस भुजबळ वस्ती नांव देण्यात यावे.
- पुनावळे येथील माळवाडी येथे किरण बोरगे यांच्या घराजवळील वस्तीस विजय नगर हे नांव देण्यात यावे.
- पुनावळे येथील संभाजी बोरगे यांच्या घराजवळील वस्तीस बोरगे वस्ती (बोरगे वाडा) हे नांव देण्यात यावे.
- पुनावळे गावांतील सावतामाळी मंदीराजवळील चौकास सावतामाळी मंदीर चौक नांव देण्यात यावे.

विषय क्र. ५ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

वॉ.क्र. ४० मधील गंगानगरमधील जेम्स स्टुडीओ पासून ते आंबेडकर भवन पर्यंत कै. बाबाजीराव रघुनाथराव पालांडे यांचे नांव देण्यात यावे.

विषय क्र. ६ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पिंपरीनगर येथील जयहिंद हायस्कूल जवळील चौकास (TJSB बँकजवळ) ज्ञानी इन्द्रजीतसिंग असे नांव देण्यात यावे.

विषय क्र. ७ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पिंपरीनगर बी.ब्लॉक १ ते ३२ पर्यंत ब्लॉक असून सुमारे २५ ते ३० वर्षापूर्वी नागरिकांसाठी म.न.पा.ने संडास ब्लॉक बांधलेले आहेत. सदर ठिकाणचे संडास ब्लॉक जुने झाल्याने तसेच काही ब्लॉक खराब झाल्याने त्या ठिकाणी पाडून आवश्यकतेनुसार नव्याने सुलभ संडास ब्लॉक मुतारी ब्लॉक, आरोग्य कोठी अशा प्रकारचे उपयोगी इमारती बांधणेत याव्यात.

बी.ब्लॉक २६,२७ मधील सर्व ब्लॉक पाडून त्या ठिकाणी एकत्रित नव्याने सुलभ शौचालय बांधणेत यावेत. तरी वरील ब्लॉक नं २६,२७,२८,२९ व १९ मधील संडास ब्लॉक पाडून मिळावेत. ही विनंती.

विषय क्र. ८ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पिंपरीनगर ही दाट लोकवस्ती व मुख्य बाजारपेठ असल्याने वाहतुक व वर्दळ सतत राहते सध्या काळेवाडी पुल ते रिव्हर रोडचा रस्ता लहान असल्यामुळे सतत ट्रॅफिक जाम होत राहते. सदर ठिकाणी एका बाजूस झोपडपट्टीचा भाग असून त्यामध्ये फोटोपासधारक राहत आहेत. सदरचे लोकांचे अन्य ठिकाणी पुनर्वसन झाल्यास रस्ता मोठा होणेस मदत होईल. तरी पिंपरी काळेवाडी पूल ते रिव्हर रोड घाटाचा रस्त्याचे रुंदीकरण करणेत यावे.

विषय क्र. ९ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

एल्प्रो कंपनी जवळील कामीनी हॉटेल जवळच्या चौकास सदगुरु श्री. वामनराव पै असे नांव देण्यात यावे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता त्वरित नामकरणाची कारवाई करावी.

विषय क्र.१० विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

बिजलीनगर येथील FOB जवळील मुतारीचा नागरिकांकडून उपयोग कमी होत असून मुतारीच्या दुर्गंधीचा रहिवाशांना उपद्रव होत असल्यामुळे सदरची मुतारी पाडण्यात यावी.
सदरचा ठराव कायम होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यात यावी.

विषय क्र. ११ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पिंपरी चिंचवड परिसरात जैन समाजाचे धर्मगुरु यांचे वेळोवेळी चार्तुमास होतात. चिंचवड गावामध्ये जैन समाज मोठया प्रमाणात असून चिंचवड येथील जैन स्थानकामध्ये सन १९८३ मध्ये पंडीतरत्न आशिषमुनिजी म.सा., १९८५ मध्ये प्रखर व्याख्यानी मंजुश्रीजी म.सा., सन १९९१ मध्ये बालब्रम्हचारी चारीत्र्यचुडामणी जीवराजजी म.सा. या जैन धर्मगरुंच्या चार्तुमासामध्ये धर्मप्रेमी श्रावक श्री. बन्सीलालजी खुशालचंदजी बंब यांनी निरंकार लगातार ३१ दिवसांचे सहा वेळा व ४८ दिवसांचे १ वेळा उपवास करुन धर्म आराधना केलेली आहे. त्याचप्रमाणे त्यांनी जीवनात अनेक वेळा ९,११ असे उपवास निरंकार केलेले आहेत. म्हणून तपस्वीरत्न असे त्यांना संबोधन्यात येत होते. तसेच पिंपरी चिंचवडमध्ये विविध सामाजिक संस्थामधून बंब परिवार सामाजिक कार्य करीत आहेत. तरी त्यांच्या कुंटुंबातील सदस्य तपस्वीरत्न कै. बन्सीलालजी बंब चौक अथवा पथ असे नामकरण चिंचवडमध्ये गावडे-भोईर आळीमध्ये करणेस मान्यता देणेत यावी.
सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

विषय क्र. १२ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. १८ किवळे येथील विकासनगर भागातील शुंभंकर अपार्टमेंट शेजारील वसाहतीस शक्ती कॉलनी असे नामकरण करणेत यावे.

विषय क्र. १३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

मोरवाडी प्रभाग क्र. २७ येथे बोरा कन्स्ट्रक्शनचे ओपन स्पेसचे जागेमध्ये मनपाचे स्थापत्य विभागाने ५०० स्के.फुटाचे बांधकाम केलेले आहे. चिंचवड व पिंपरी, मोरवाडी या प्रभागातील लोकांना वाय.सी.एम. ला प्रत्येकवेळी किरकोळ आजारांकरिता जावे लागते तरी वरील बांधकामामध्ये बाहय रुग्णालय सुरु करणेत यावे.

विषय क्र. १४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात हॉकर्स झोनबाबत धोरण राबविणेकरिता प्रभाग स्तरावर फेरीवाला, टपरी, पथारी, हातगाडी इत्यादींचे सर्व्हेक्षण करणेत आलेले आहे. परंतू यातील ब-याच जणांनी हॉकर्स झोनबाबत माहिती मिळाली नसल्यामुळे त्यांना मुदतीत अर्ज सादर करता आला नाही.

तरी हॉकर्स झोनबाबत धोरण राबविणेकरिता दि.३०/१/२०१३ पर्यंत मुदतवाढ दयावी जेणेकरुन यातील खरे लाभार्थी यांना फायदा होईल. सदरचा विषय कायम होणेची वाट न पाहता मंजूर करावा तसेच मा. आयुक्त साहेब यांच्या निदर्शनास आणुन नजिकच्या मा. महापालिका सभेमध्ये दाखल करावा.

विषय क्र. १५ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

काळेवाडी ते एम्पायर इस्टेट पुलाचे काम चालू आहे. त्याला चिंचवड परिसरास जोडणारा कुठलाही दुवा (जोडरस्ता) नाही. कृपया स्थानिक लोकांचा विचार करता या पुलास जोडरस्ता करावा.

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता पुढील कार्यवाही त्वरित करावी.

विषय क्र. १६ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पुणे मुंबई हायवे ते काळेवाडी मार्गे (एम्पायर इस्टेट, लिंक रोड, पवनानदी) होणा-या पुलावर लिंकरोडवरुन जोड रस्ता बनविणेबाबत.

ऑटोक्लस्टर ते पुणे-मुंबई हायवे, एम्पायर इस्टेट, पवनानदी ते काळेवाडी असा मोठा पुल तयार होत आहे. या होऊ घातलेल्या पुलावरुन लिंकरोडवरुन चढण्या व उतरण्यासाठी जोडरस्ता बनविणे आवश्यक आहे.

तरी जोडरस्ता बनविण्याच्या विषयास मान्यता दयावी ही विनंती.

विषय क्र. १७ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सहलीचे आयोजनाबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभा समितीमध्ये ३२ नगरसदस्य व नगरसदस्या असुन केरळमध्ये अभ्यास दौ-याचे नियोजन आहे. तरी सदर विषयांस मंजूरी मिळावी.

ठराव क्र.५९ विषय क्र.१

दि. १९/१२/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा. शमीम पठाण अनुमोदक : मा. लोंढे नारायण लोंढे.

संदर्भ : मा. शमीम पठाण यांचे दि.१९/१२/२०१२ चे पत्र.

मा. सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. २१ मधील इंदिरानगर येथील संतोषी मॉ कॉम्प्लेक्स ते शिव मंदिर पर्यंत या रस्त्याला कै. संदिप भिमराव साळुंखे (पथ) असे नामकरण करणेत यावे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.६० विषय क्र.२

दि. १९/१२/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन अनुमोदक: मा.ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव

संदर्भ : मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन यांचे दि.१९/१२/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

क्रां. चापेकर स्मारक समितीचे गुरुकुल येथील रस्त्यांवर दिव्यांची व्यवस्था करणेस, तसेच चिंचवड गावांतील म.न.पा. शाळेतील क्रिडांगणामध्ये जादा प्रकाश पडणारे दिवे (हायमास्ट) बसविणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.६१ विषय क्र.३

दि. १९/१२/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन अनुमोदक: मा.ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव

संदर्भ : मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन यांचे दि.१९/१२/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

चिंचवडगांव येथील दशक्रिया विधी घाटातील स्नानगृह हे सुलभ शौचालयाजवळ स्थलांतरीत करण्यात यावे. तसेच तेथील मुतारी काढून टाकणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.६२ विषय क्र.४

दि. १९/१२/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा. ओव्हाळ शेखर अशोक अनुमोदक: मा.ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव

संदर्भ : मा. ओव्हाळ शेखर अशोक यांचे दि.१९/१२/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

नामकरण करणेबाबत.

- पुनावळे येथील माळवाडी येथील संत सावता माळी मंदीराजवळील लोक वस्तीस माळवाडी हे नांव देण्यात यावे.
- पुनावळे येथील सागर ओव्हाळ यांच्या घराजवळील वस्तीत ओव्हाळ वस्ती हे नांव देण्यात यावे.
- पुनावळे येथील तलाठी ऑफीसकडून कैलासनगगरकडे जाणा-या रस्त्यास जिजाबाई ओव्हाळ मार्ग नांव देण्यात यावे.
- पुनावळे येथील माळवाडी येथे विठ्ठल भुजबळ यांच्या घराजवळील वस्तीस भुजबळ वस्ती नांव देण्यात यावे.
- पुनावळे येथील माळवाडी येथे किरण बोरगे यांच्या घराजवळील वस्तीस विजय नगर हे नांव देण्यात यावे.
- पुनावळे येथील संभाजी बोरगे यांच्या घराजवळील वस्तीस बोरगे वस्ती (बोरगे वाडा) हे नांव देण्यात यावे.
- पुनावळे गावांतील सावतामाळी मंदीराजवळील चौकास सावतामाळी मंदीर चौक नांव देण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.६३ विषय क्र.५

दि. १९/१२/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा.पानसरे अमिना मोहंम्मद अनुमोदक: मा.पालांडे सुजाता सुनिल

संदर्भ : मा.पानसरे अमिना मोहंम्मद यांचे दि.१९/१२/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

वॉ.क्र. ४० मधील गंगानगरमधील जेम्स स्टुडीओ पासून ते आंबेडकर भवन पर्यंत कै. बाबाजीराव रघुनाथराव पालांडे यांचे नांव देणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.६४ विषय क्र.६

दि. १९/१२/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव अनुमोदक: मा.आसवानी सविता धनराज

संदर्भ : मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव यांचे दि.१९/१२/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरीनगर येथील जयहिंद हायस्कूल जवळील चौकास (TJSB बँकजवळ) ज्ञानी इन्द्रजीतसिंग असे नांव देणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.६५ विषय क्र.७

दि. १९/१२/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा.आसवानी सविता धनराज अनुमोदक: मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव

संदर्भ : मा.आसवानी सविता धनराज यांचे दि.१९/१२/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरीनगर बी.ब्लॉक १ ते ३२ पर्यंत ब्लॉक असून सुमारे २५ ते ३० वर्षापूर्वी नागरिकांसाठी म.न.पा.ने संडास ब्लॉक बांधलेले आहेत. सदर ठिकाणचे संडास ब्लॉक जुने झाल्याने तसेच काही ब्लॉक खराब झाल्याने त्या ठिकाणी पाडून आवश्यकतेनुसार नव्याने सुलभ संडास ब्लॉक मुतारी ब्लॉक, आरोग्य कोठी अशा प्रकारचे उपयोगी इमारती बांधणेत याव्यात.

बी.ब्लॉक २६,२७ मधील सर्व ब्लॉक पाडून त्या ठिकाणी एकत्रित नव्याने सुलभ शौचालय बांधणेत यावेत. तरी वरील ब्लॉक नं २६,२७,२८,२९ व १९ मधील संडास ब्लॉक पाडणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.६६ विषय क्र.८

दि. १९/१२/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा.आसवानी सविता धनराज अनुमोदक: मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव

संदर्भ : मा.आसवानी सविता धनराज यांचे दि.१९/१२/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरीनगर ही दाट लोकवस्ती व मुख्य बाजारपेठ असल्याने वाहतुक व वर्दळ सतत राहते सध्या काळेवाडी पुल ते रिव्हर रोडचा रस्ता लहान असल्यामुळे सतत ट्रॅफिक जाम होत राहते. सदर ठिकाणी एका बाजूस झोपडपट्टीचा भाग असून त्यामध्ये फोटोपासधारक राहत आहेत. सदरचे लोकांचे अन्य ठिकाणी पुनर्वसन झाल्यास रस्ता मोठा होणेस मदत होईल. तरी पिंपरी काळेवाडी पूल ते रिव्हर रोड घाटाचे रस्त्याचे रुंदीकरण करणेस मान्यता दिली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.६७ विषय क्र.९

दि. १९/१२/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा.शमीम पठाण अनुमोदक: मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख

संदर्भ : मा. शमीम पठाण यांचे दि.१९/१२/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

एल्प्रो कंपनी जवळील कामीनी हॉटेल जवळच्या चौकास सदगुरु श्री वामनराव पै असे नांव देण्यात यावे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता त्वरित नामकरणाची कारवाई करावी.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.६८ विषय क्र.१०

दि. १९/१२/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव अनुमोदक: मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

संदर्भ : मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव यांचे दि.१९/१२/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

बिजलीनगर येथील FOB जवळील मुतारीचा नागरिकांकडून उपयोग कमी होत असून मुतारीच्या दुर्गंधीचा रहिवाशांना उपद्रव होत असल्यामुळे सदरची मुतारी पाडण्यात यावी.

सदरचा ठराव कायम होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.६९ विषय क्र.११

दि. १९/१२/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव अनुमोदक: मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव

संदर्भ : मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव यांचे दि.१९/१२/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरी चिंचवड परिसरात जैन समाजाचे धर्मगुरु यांचे वेळोवेळी चार्तुमास होतात. चिंचवड गावामध्ये जैन समाज मोठया प्रमाणात असून चिंचवड येथील जैन स्थानकामध्ये सन १९८३ मध्ये पंडीतरत्न आशिषमुनिजी म.सा., १९८५ मध्ये प्रखर व्याख्यानी मंजुश्रीजी म.सा., सन १९९१ मध्ये बालब्रम्हचारी चारीत्र्यचुडामणी जीवराजजी म.सा. या जैन धर्मगरुंच्या चार्तुमासामध्ये धर्मप्रेमी श्रावक श्री. बन्सीलालजी खुशालचंदजी बंब यांनी निरंकार लगातार ३१ दिवसांचे सहा वेळा व ४८ दिवसांचे १ वेळा उपवास करुन धर्म आराधना केलेली आहे. त्याचप्रमाणे त्यांनी जीवनात अनेक वेळा ९, ११ असे उपवास निरंकार केलेले आहेत. म्हणून तपस्वीरत्न असे त्यांना संबोधन्यात येत होते. तसेच पिंपरी चिंचवडमध्ये विविध सामाजिक संस्थामधून बंब परिवार सामाजिक कार्य करीत आहेत. तरी त्यांच्या कुंटुंबातील सदस्य तपस्वीरत्न कै. बन्सीलालजी बंब चौक अथवा पथ असे नामकरण चिंचवडमध्ये गावडे-भोईर आळीमध्ये करणेस मान्यता देणेत आली.

सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.७० विषय क्र.१२

दि. १९/१२/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा. तरस बाळासाहेब जयवंत अनुमोदक: मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव संदर्भ : मा. तरस बाळासाहेब जयवंत यांचे दि.१९/१२/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. १८ किवळे येथील विकासनगर भागातील शुंभंकर अपार्टमेंट शेजारील वसाहतीस शक्ती कॉलनी असे नामकरण करणेत यावे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.७१ विषय क्र.१३

दि. १९/१२/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा. साळुंके सविता सुरेश अनुमोदक: मा. पालांडे सुजाता सुनिल

संदर्भ : मा. साळुंके सविता सुरेश यांचे दि.१९/१२/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मोरवाडी प्रभाग क्र. २७ येथे बोरा कन्स्ट्रक्शनचे ओपन स्पेसचे जागेमध्ये मनपाचे स्थापत्य विभागाने ५०० स्के.फुटाचे बांधकाम केलेले आहे. चिंचवड व पिंपरी, मोरवाडी या प्रभागातील लोकांना वाय.सी.एम. ला प्रत्येकवेळी किरकोळ आजारांकरिता जावे लागते तरी वरील बांधकामामध्ये बाहय रुग्णालय सुरु करणेत यावे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.७२ विषय क्र.१४

दि. १९/१२/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा. साळुंके सविता सुरेश अनुमोदक: मा. शमीम पठाण

संदर्भ : मा. साळुंके सविता सुरेश यांचे दि.१९/१२/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात हॉकर्स झोनबाबत धोरण राबविणेकरिता प्रभाग स्तरावर फेरीवाला, टपरी, पथारी, हातगाडी इत्यादींचे सर्व्हेक्षण करणेत आलेले आहे. परंतू यातील ब-याच जणांनी हॉकर्स झोनबाबत माहिती मिळाली नसल्यामुळे त्यांना मुदतीत अर्ज सादर करता आला नाही.

तरी हॉकर्स झोनबाबत धोरण राबविणेकरिता दि.३०/१/२०१३ पर्यंत मुदतवाढ दयावी जेणेकरुन यातील खरे लाभार्थी यांना फायदा होईल. सदरचा विषय कायम होणेची वाट न पाहता मंजूर करावा तसेच मा. आयुक्त साहेब यांच्या निदर्शनास आणुन देणेस व आदेशानुसार नजिकच्या मा. महापालिका सभेमध्ये दाखल करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.७३ विषय क्र.१५

दि. १९/१२/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा. को-हाळे अनंत सुभाष अनुमोदक: मा. शमीम पठाण

संदर्भ : मा. को-हाळे अनंत सुभाष यांचे दि.१९/१२/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

काळेवाडी ते एम्पायर इस्टेट पुलाचे काम चालू आहे. त्याला चिंचवड परिसरास जोडणारा कुठलाही दुवा (जोडरस्ता) नाही. कृपया स्थानिक लोकांचा विचार करता या पुलास जोडरस्ता करावा.

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.७४ विषय क्र.१६

दि. १९/१२/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा. को-हाळे अनंत सुभाष अनुमोदक: मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव

संदर्भ : मा. को-हाळे अनंत सुभाष यांचे दि.१९/१२/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पुणे मुंबई हायवे ते काळेवाडी मार्गे (एम्पायर इस्टेट, लिंक रोड, पवनानदी) होणा-या पुलावर लिंकरोडवरुन जोड रस्ता बनविणेबाबत.

ऑटोक्लस्टर ते पुणे-मुंबई हायवे, एम्पायर इस्टेट, पवनानदी ते काळेवाडी असा मोठा पुल तयार होत आहे. या होऊ घातलेल्या पुलावरुन लिंकरोडवरुन चढण्या व उतरण्यासाठी जोडरस्ता बनविणे आवश्यक आहे.

तरी जोडरस्ता बनविण्याच्या विषयास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.७५ विषय क्र.१७

दि. १९/१२/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा. पानसरे अमिना मोहंम्मद अनुमोदक: मा. पवार यमुनाताई रमणनाना

संदर्भ : मा. पानसरे अमिना मोहंम्मद यांचे दि.१९/१२/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

सहलीचे आयोजनाबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीमध्ये ३२ नगरसदस्य व नगरसदस्या असुन केरळमध्ये अभ्यास दौ-याचे नियोजन आहे. सदर विषयास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

बैठकीमध्ये उपस्थित **सर्व सन्मा नगरसदस्यांनी** खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले व त्यावर चर्चा झाली.

- ठेकेदार काम करीत नसतील तर त्यांना नोंटीसा दयाव्यात व कामात सुधारणा न झाल्यास त्यांचेवर कारवाई करावी.
- तालेराचे जागेवर भराव होत आहे याबाबत कारवाई होणे गरजेचे आहे.
- उद्यानातील रात्रपाळीचे वॉचमन व्यवस्थित काम करत नाहीत. त्यामुळे तिथे गैरप्रकार होणेची शक्यता असलेने उद्यान विभागाने याकडे गांर्भियाने लक्ष देणे आवश्यक आहे.
- वॉ. क्र. २५ मध्ये स्थापत्य विषयक व ड्रेनेज विषयक कामे वेळचेवेळी होत नाही त्याकडे लक्ष दयावे.
- मोकाट कुत्रे रस्त्याने फिरतात व त्यामुळे नागरिकांना त्रास होतो. काही ठिकाणी कुत्र्याने चावा घेतलेमुळे लहान मुलांना व नागरिकांना गंभीर दुखापती झालेल्या आहेत. यावर लवकरात लवकर ठोस उपाय झाला पाहीजे.
- पिंपरी येथील साई चौक भाजी मंडई, शगुन चौक पिंपरी परिसर इ. मध्ये टप्-या हातगाडयांवर कावाईबाबत आम्हाला न सांगता कारवाई का केली? अशी विचारणा मा. मंचरकर गिता सुशिल यांनी केली यावर मा. प्रभाग अधिकारी यांनी लेखी तक्रार लोकशाही दिनामध्ये प्राप्त झालेने कारवाई केली असा खुलासा केला.
- वरील विषय मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव यांनी उचलून धरला व जोपर्यंत हॉकर्स झोनबाबत निर्णय होत नाही. तोपर्यंत हातगाडी/ फेरीवाले यांचेवर कारवाई करु नये त्यांची हातावरची पोटं असतात. त्यांच्या हातगाडया टप-या जप्त केल्यावर त्यांनी खायचे काय? ही कारवाई थांबली नाही तर आम्ही प्रशासनाचा व मा. आयुक्त यांचा निषेध करु. व तसा ठराव प्रभाग समितीमध्ये मांडू असे मत मांडले. यावर मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव यांनी सदर विषयाबाबत ठराव करणेऐवजी मा. आयुक्त यांची भेट घेऊन समक्ष चर्चा करु असे सांगितले.

- मा. प्रभाग अधिकारी यांनी ब प्रभाग समितीमध्ये झालेल्या ठरांवावर त्वरीत अंमलबजावणी करणेबाबत सर्व अधिकारी / कर्मचारी यांना सुचना दिल्या. तसेच काही अडचणी असतील तर त्याबाबत संबंधित सन्मा. नगरसदस्यांशी संपर्क साधुन चर्चा करावी. नविन प्रभाग रचनेनुसार बदल झाल्याने काही अडचण येत असल्यास संबंधित विभागाशी समन्वय साधुन कार्यवाही करावी.

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. अध्यक्षा ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
[ ठाकरे मंदाकिनी अर्जुन ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

प्रति,
सर्व संबंधित

प्रशासन अधिकारी
सभाशाखा, ब प्रभाग समिती
पि.चिं.मनपा, चिंचवड-३३

क्र. एएमसी/बप्र२/कावि/३८६/२०१२, दि.७/०१/२०१३